# गुरु नानक खालसा महाविद्यालय (स्वायत्त), माटुंगा, मुंबई

## ‘लेखन प्रेरणा दिन’ कार्यक्रम अहवाल

मराठी विभाग आणि महाविद्यालय ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘लेखन प्रेरणा दिन’ साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ‘लेखन प्रेरणा दिन’ साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार गुरु नानक खालसा महाविद्यालय (स्वायत्त), माटुंगा, मुंबई येथील मराठी विभाग आणि महाविद्यालय ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळेत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ‘लेखन प्रेरणा दिन’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आयोजक : गुरु नानक खालसा महाविद्यालय (स्वायत्त), मराठी विभाग आणि महाविद्यालय ग्रंथालय

दिनांक : १ ऑगस्ट २०२६, शनिवार

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने कार्यक्रमाचे खालील माहितीपत्रक वापरून घोषणा केली.



# कार्यक्रम

1) कार्यक्रमाचे नाव: अण्णा भाऊ साठे यांच्या कथांचे वाचन

वेळ : सकाळी ९.०० ते १०.३०

स्थळ : गुरु नानक खालसा महाविद्यालयाचे ग्रंथालय

प्रमुख विषय : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा परिचय व विद्यार्थ्यांना लेखनाची प्रेरणा देणे.

कार्यक्रमाची सुरुवात मराठी विभागाच्या प्राध्यापिका मानसी उतेकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामधून कष्टकरी, वंचित व उपेक्षित समाजाचे जीवन, त्यांचा संघर्ष आणि सामाजिक वास्तव प्रभावीपणे मांडले गेले आहे, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या कथांचे वाचन करण्यात आले. या कथावाचनात मराठी विभागाच्या तिन्ही वर्षांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रथम वर्षाच्या विद्यार्थी प्राची पुजारी हिने 'खुळंवाडी' या कथासंग्रहातील 'खुळंवाडी' या शीर्षक कथेचे वाचन केले. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी नूतन संसारे हिने 'पिराजीची भानगड' या कथेचे वाचन केले. तसेच तृतीय वर्षांचा विद्यार्थी आदित्य चव्हाण ह्याने 'विष्णुपंत कुळकर्णी' या कथेचे वाचन केले.तसेच दलित साहित्यातील 'युगास्तंभ अण्णाभाऊ साठे आणि बाबुराव बागूल' या पुस्तकातील निवडक कथात्मक साहित्याच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांवर रेणुका खडतरे हिने वाचन व विवेचन केले.

या कथावाचनामुळे विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे विविध पैलू समजून घेण्यास मदत झाली.

त्यानंतर मराठी विभागाच्या प्राध्यापिका नम्रता कुंभार यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमातून मिळालेली प्रेरणा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात कशी अंगीकारावी व अण्णाभाऊ साठे यांचे विचार केवळ ऐकून न घेता ते आपल्या कृतीत उतरविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन करून आणि समता, बंधुता व माणुसकीची मूल्ये आपल्या आचरणात आणण्याचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

2) निबंध स्पर्धा

स्थळ : Google Form Link: https://forms.gle/cM8pjRhvdZGeafBX7

विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धेसाठी पुढील विषय देण्यात आले होते :

१. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लावणी आणि पोवाड्यांचे सामर्थ्य.

२. अण्णाभाऊ साठे : कष्टकऱ्यांचे वाली आणि उपेक्षितांचा आवाज.

निबंध लेखनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा, सामाजिक विचारांचा आणि त्यांच्या लेखनातील वास्तववदर्शी दृष्टिकोनाचा अभ्यास करण्याची संधी मिळाली.

कॉलेजच्या ग्रंथालयाने तयार केलेल्या गूगल फॉर्ममध्ये विद्यार्थ्यांनी ८ निबंध सादर केले होते. निबंध स्पर्धेचे विजेते म्हणून निवडलेल्या त्या तिघांना ग्रंथालयातर्फे आयोजित कार्यक्रमात पुस्तकांच्या स्वरूपात बक्षिसे दिली जातील.

**कथाकथन फोटो:**













हा अहवाल मराठी विभागाच्या सहायक प्राध्यापिका कुमारी नम्रता कुंभार आणि ग्रंथपाल डॉ. नीलम चव्हाण यांनी तयार केला आहे.